अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | शुक्रवार
०३.०७.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १५३ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## एसटी महामंडळाची ई-बस चोरली

*** चार्जिंग संपली अन...गेम झाला, एका चीपमुळं सापडलं २० गुन्हे असलेल्या तेलंगणाच्या चोराच लोकेशन**



*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**नागपुर** – नागपुरातून चक्क दीड कोटी रुपयांची एसटी महामंडळाची इलेक्ट्रिक बस चोरीला गेल्याची एक अजब आणि तितकीच धक्कादायक घटना समोर आली आहे.

नागपूरच्या बसस्थानकातून चोरी झालेली ही 'शिवाई' बस अमरावतीच्या राजापेठ पोलिसांनी चोरट्यासह पकडली केली आहे. अटक करण्यात आलेल्या या आंतरराज्यीय चोरट्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि त्याने दिलेली माहिती ऐकून स्वतः पोलीसही चक्रावून गेले आहेत चार्जिंग स्टेशनवरून थेट बस पळवली!

१ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास नागपूरमधील इमामवाडा बसस्थानकातील चार्जिंग स्टेशनवर 'एमएच ४९/ बी. झेड. ८२५८' क्रमांकाची 'शिवाई' इलेक्ट्रिक बस उभी होती. यावेळी चोराने सुरक्षा यंत्रणेला गुंगारा देत तब्बल १ कोटी ५३ लाख रुपये किमतीची ही बस तिथून पळवून नेली.

एसटी महामंडळाची बस चोरीला गेल्याने पोलिसांची मोठी धावपळ उडाली होती. दरम्यान, अमरावती शहरातील राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नंदा मार्केटजवळ एक संशयास्पद बस उभी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

## स्टिंग एनर्जी ड्रिंकवरुन चर्चा, तुकाराम मुंढेंची विधानभवनात एन्ट्री

### नरहरी झिरवळांनी थेट आदेश देऊन टाकले!

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – राज्यात शाळा परिसरामध्ये स्टिंग पेय विक्रीला बंदी घालण्यात आली आहे. शाळांच्या ५०० मीटर परिसरामध्ये आता स्टिंग पेय विक्रीसाठी बंदी असणार आहे. सध्या सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनात श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे आमदार विक्रम पाचपुते यांनी स्टिंग पेयबाबत प्रश्न उपस्थित केला होता. यानंतर मंत्री नरहरी झिरवळ यांनी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांचे निर्देश राज्यात शाळा परिसरामध्ये स्टिंग पेय विक्रीला बंदी घालण्याचे निर्देश दिले.




स्टिंग एनर्जी ड्रिंकमुळे आरोग्यावर दुष्परिणाम होत आहेत. नियमात बसत असले तरी मुलांना याची सवय लागते. लहान मुले, गरोदर महिलांसाठी पिण्यासाठी योग्य नसल्याचे स्टिंग पेयच्या बाटलीवरचं लिहिले आहे. लहान मुलांना याची विक्री होवू नये. दारूपेक्षाही स्टिंग एनर्जी ड्रिंक हे घातक आहे, अशी माहिती श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे आमदार विक्रम पाचपुते यांनी विधानसभेत दिली. यावर स्टिंग हे शाळेच्या आवारात हे विकले जातंय हे मान्य आहे. शाळांच्या ५०० मीटरच्या आत अंमली पदार्थांसह स्टिंग एनर्जी ड्रिंकवरही बंदी घालू, असं आश्वासन अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी दिली पावसाळी आजारांच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात.

तसेच नागरिकांमध्ये जलजन्य आजारांबाबत पुरेशी जनजागृती करण्यासाठी विभागनिहाय पातळीवर पुढाकार घेण्यात यावा. महानगरपालिकेचे दवाखाने आणि रुग्णालयाच्या ठिकाणी पुरेसा औषधसाठा उपलब्ध करून देण्याचे निर्देशही त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाला दिले.

## ठाकरे गट म्हणजे आता 'प्रायव्हेट लिमिटेड' पक्ष

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – ठाकरे गटाने त्यांच्या २५ वर्षांच्या मुंबई महापालिकेतील सत्ताकाळात एका तरी कंत्राटदारावर किंवा दोषी अधिकाऱ्यावर कारवाई केल्याचे उदाहरण देऊन दाखवावे. महायुती सरकारच्या काळात मात्र चुका लपवण्याऐवजी थेट कारवाई करण्याची ठाम भूमिका आहे,' अशा आक्रमक शब्दांत भाजप प्रमुख प्रवक्ते नवनाथ बन यांनी ठाकरे गटावर जोरदार निशाणा साधला आहे. महायुती सरकारच्या काळात महापौर, अधिकारी आणि लोकप्रतिनिधी स्वतः घटनास्थळी जाऊन परिस्थितीचा आढावा घेत असून, मुंबईकरांचे जीवन सुरळीत ठेवण्यास सरकार सर्वोच्च प्राधान्य देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दोषी अधिकाऱ्यांचे निलंबन आणि कंत्राटदारांवर गुन्हे



दाखल कुर्ल्यातील दुर्दैवी दुर्घटनेचा संदर्भ देत नवनाथ बन यांनी सांगितले की, या घटनेबाबत सरकारने तातडीने कडक पावले उचलली आहेत. या प्रकरणात सुरुवातीला तीन आणि त्यानंतर आणखी चार महापालिका अधिकाऱ्यांचे थेट निलंबन करण्यात आले असून, संबंधित कंत्राटदारावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाविकास आघाडीच्या काळात अशा दुर्घटनांमध्ये कोणत्याही अधिकाऱ्यावर कारवाई झाली नव्हती, याकडे त्यांनी लक्ष वेधले. तसेच मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांच्या वक्तव्याचा विपर्यास करून आणि जयंत पाटील यांच्या प्रश्नाला उत्तर देताना आलेल्या हसण्याचा चुकीचा अर्थ लावून संवेदनशील घटनेचे राजकारण केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

**ठाकरे गटाने २५ वर्षांत एका तरी कंत्राटदारावर कारवाई केलीय का? : भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांचा घणा-घात**

## सिया गोयलच्या पॉलिग्राफ चाचणीस संमती

### केतन अगरवाल हत्याप्रकरणी तपासाला वेग

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**पुणे** – पुण्यातील प्रसिद्ध रिअल इस्टेट व्यावसायिक केतन अगरवाल यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी तथा त्यांची होणारी पत्नी सिया गोयल हिने अखेर पोलिसांच्या पॉलिग्राफ चाचणीसाठी लेखी संमती दिली आहे. या चाचणीमुळे १८ जून रोजी लोहगड किल्ल्यावर नेमके काय घडले आणि केतन अगरवाल यांना सुमारे ४०० फूट खोल दरीत ढकलण्यामागे आणखी कोणाचा सहभाग होता का, याचा उलगडा होण्यास मदत होण्याची शक्यता आहे.



आरोपीच्या संमतीशिवाय पॉलिग्राफ चाचणी घेता येत नसल्याने तपास यंत्रणेसमोर अडचण निर्माण झाली होती. मात्र, सिया गोयलच्या संमतीनंतर या तपासाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तपासादरम्यान 'क्रॉस मॅरेज'चाही मुद्दा समोर आला आहे. केतन अगरवाल यांचा साखरपुडा सिया गोयल हिच्याशी झाला होता, तर केतन यांच्या बहिणीचे लग्न सियाचा भाऊ साहिल याच्याशी होणार होते. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, सियाचे चेतन चौधरी याच्याशी प्रेमसंबंध असल्याचा संशय असून, त्याच्याशी विवाह करण्याच्या उद्देशाने हा कट रचल्याचा आरोप तपास यंत्रणांनी केला आहे. या आरोपांची अंतिम पुष्टी न्यायालयीन प्रक्रियेनंतरच होणार आहे. सध्या सिया गोयल आणि चेतन चौधरी हे दोघेही पोलीस कोठडीत असून, सियाच्या मोबाईलमधील माहिती आणि आगामी पॉलिग्राफ चाचणीचे निष्कर्ष तपासासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत.

## गंभिर गुन्ह्यात अडकलेले तलाठी ठाकरे निलंबित

**चौकशी पुर्ण होईपर्यंत मुख्यालय धामणगाव निश्चित**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**अमरावती** – अत्याचार आणि विनयभंगासारख्या गंभीर गुन्ह्यात अडकलेल्या विपुल भानुदास ठाकरे या तलाठ्यावर जिल्हा प्रशासनाने अखेर निलंबनाची कारवाई केली आहे. या गुन्ह्यामुळे महसूल विभागाच्या प्रतिमेला धक्का बसत असल्याने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी एक जुलै रोजी निलंबनाचे आदेश जारी केले आहेत. या कारवाईमुळे महसूल वतुर्ळात चांगलीच खळबळ उडाली आहे.



विपुल ठाकरे याच्यावर अमरावतीच्या एका पीडित महिलेने १९ मे रोजी तक्रार दिली होती. या तक्रारीनुसार गाडगे नगर पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या ३७६ (२) (एन), ३२३, ५०४ आणि ५०६ कलमान्वये गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

संबंधित महिलेला मारहाण करणे, धमकावणे आणि सातत्याने लैंगिक छळ करणे अशा गंभीर स्वरूपाचे आरोप ठाकरेवर ठेवण्यात आले आहेत. या प्रकरणाची व्याप्ती मोठी असून, विविध प्रसारमाध्यमे आणि समाज माध्यमांवर यावरून जोरदार चर्चा रंगली होती. प्रशासकीय कामात असलेल्या व्यक्तीवर इतके गंभीर गुन्हे दाखल असल्याने, त्याने पदावर राहिल्यास साक्षी दारांवर दबाव येण्याची किंवा तपासात अडथळे निर्माण होण्याची शक्यता होती.

या पार्श्व भूमीवर जिल्हा धिकाऱ्यांनी त्याला नोटीस बजावली होती, मात्र त्याने कसलेही समाधानकारक स्पष्टीकरण दिले नाही. अखेर महाराष्ट्र नागरी सेवा नियमावलीतील तरतुदीनुसार प्रशासनाने त्याला तात्काळ प्रभावाने निलंबित केले आहे. निलंबित तलाठ्यावर मुख्यालयी राहण्याची सक्ती निलंबनाच्या कालावधीत विपुल ठाकरे याचे मुख्यालय धामणगाव रेल्वे तहसील कार्यालय निश्चित करण्यात आले आहे.

## आ.गजानन लवटे यांच्याकडून भव्य 'शिवसृष्टी' साठी ९०.६० लाखांचा निधी मंजुर

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – शहरासह संपूर्ण तालुक्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आणि ऐतिहासिक बातमी समोर आली आहे. गेल्या अनेक दशकांपासून स्थानिक शिवप्रेमी आणि नागरिकांचे स्वप्न असलेल्या भव्य 'शिवसृष्टी' आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या निर्मितीला शिवसेना पक्षाचे धडाडीचे आमदार गजानन लवटे यांनी आपल्या कार्यकाळातील अवघ्या दीड वर्षात या ऐतिहासिक कामासाठी ९० लक्ष ६० हजार रुपयांचा भरीव निधी प्रस्तावित आहे. या नावीन्यपूर्ण कामाचे अधिकृत पत्र आमदार लवटे यांनी नगरसेवक




सुयोग खाडे यांच्याकडे सुपूर्द केले असून, यामुळे शहराच्या सांस्कृतिक वैभवात मोठी भर पडणार आहे.

अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अंजनगाव सुर्जी शहरामध्ये आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा एक भव्य आणि देखणा पूर्णाकृती पुतळा उभा राहावा, यासाठी शहरातील तसेच तालुक्यातील अनेक सामाजिक संघटना, शिवप्रेमी आणि सर्वसामान्य नागरिकांनी वेगवेगळ्या पातळीवर अनेक वर्षांपासून मोठे प्रयत्न केले.

## निर्वासित नव्हे, संघर्षरत योद्धा! मोहन भागवत यांचे प्रतिपादन

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**नागपूर** – फाळणीनंतर जे लोक पाकिस्तानातून भारतात आले, ते 'निर्वासित' (रिफ्युजी) नव्हते, तर ते मातृभूमी आणि धर्मावरील प्रेमापोटी प्रचंड हालअपेष्टा आणि वेदना सहन करणारे 'संघर्षरत योद्धे' होते, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले आहे.



नव्याने निर्माण झालेल्या पाकिस्तानात पिढ्यानपिढ्या कमावलेली संपत्ती, जमीन आणि व्यवसाय मागे सोडून या लोकांनी भारताची निवड केली, याकडे त्यांनी लक्ष वेधले. नागपूर येथे सिंधी समाजाद्वारे चालवल्या जाणाऱ्या 'सिंधू एज्युकेशन सोसायटी'च्या ७५ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बुधवारी ते बोलत होते. सिंधू एज्युकेशन सोसायटीच्या ७५ वर्षांच्या प्रवासाचा उल्लेख करत ते म्हणाले की, असे टप्पे संस्थेने केलेल्या कामाचा आढावा घेण्याची आणि आपल्या ध्येयांचे स्मरण करण्याची संधी देतात.



# लाभार्थी शेतकऱ्यांच्या थकबाकीवर व्याज आकारणीस मनाई

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती २०२६ योजनेअंतर्गत लाभार्थ्यांच्या पात्र थकीत रकमेवर व्याज आकारण्यात येऊ नये, अशी स्पष्ट सूचना राज्य सरकारने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांना दिली आहे.

सहकार विभागाने गुरुवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील कर्जमुक्ती आणि एकवेळ समझोता (ओटीएस) योजनेस पात्र असणाऱ्या शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर १ एप्रिल २०२६ ते योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत योजनेच्या निकषानुसार पात्र थकीत रकमेवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी व्याज आकारणी केली जाऊ नये, असे या निर्णयात नमूद करण्यात आले आहे. कर्जमुक्ती योजनेच्या संगणकीय प्रणालीवर थकीत कर्जखात्यांची माहिती तयार करण्याचे आणि संगणकीय प्रणालीवर सादर करावयाचे कामकाज जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थामार्फत सुरू आहे. या प्रक्रियेस काही कालावधी लागणार असल्याने शेतकऱ्यांच्या कर्जखात्यामध्ये कर्जमाफीची रक्कम प्रत्यक्ष हस्तांतरीत होण्यास विलंब होईल.

# २.७९ लाख विद्यार्थ्यांची 'नीट' फेरपरीक्षेला 'दांडी'

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)



**नवी दिल्ली** – नीट-यूजी २०२६ फेरपरीक्षा २१ जून रोजी घेण्यात आली, मात्र परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या एकूण २२.७९ लाख उमेदवारांपैकी तब्बल २.७९ लाखांहून अधिक विद्यार्थी या परीक्षेला अनुपस्थित राहिल्याचे वृत्त आहे. फेरपरीक्षेचा निकाल आगामी २० जुलैपर्यंत जाहीर होण्याची शक्यता आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) तात्पुरत्या उत्तरतालिकेवरील हरकतींचा आढावा घेतल्यानंतर आता मूल्यमापनाची प्रक्रिया सुरू केली आहे.

गेल्या ३ मे रोजी झालेल्या मूळ परीक्षेत पेपरफुटीचे आरोप झाल्यानंतर ती परीक्षा रद्द करण्यात आली होती. त्यानंतर २१ जून रोजी फेरपरीक्षा घेण्यात आली. मात्र, या परीक्षेला विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत मोठी घट झाल्याचे पाहायला मिळाले. परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या एकूण २२.७९ लाख उमेदवारांपैकी सुमारे २० लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. या फेरपरीक्षेसाठी विद्यार्थ्यांची उपस्थिती जवळपास ८८ टक्के होती, जी मूळ परीक्षेतील ९६ टक्क्यांहून अधिक उपस्थितीच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी आहे. पेपरफुटीच्या वादामुळे निर्माण झालेली अनिश्चितता, विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण आणि अल्प कालावधीत पुन्हा परीक्षेला सामोरे जाण्याचे आव्हान, या कारणांमुळे उपस्थिती घसरल्याचे शिक्षण तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

# आमदार साजिद पठाण यांना बिष्णोई टोळीकडून धमकी

**विधानसभेत काँग्रेस आक्रमक**

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – काँग्रेसचे अकोल्याचे आमदार साजिद पठाण यांना बिष्णोई टोळीच्या नावाने पुन्हा जीवे मारण्याची धमकी आल्याचा मुद्दा गुरुवारी विधानसभेत गाजला.

दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बिष्णोई टोळीविरोधात कठोर कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर पुन्हा अशी धमकी आल्याने काँग्रेस आमदारांनी सभागृहात आक्रमक भूमिका घेतली. दरम्यान, विधानसभा अध्यक्षांनी धमकीची दखल घेत पठाण यांच्या सुरक्षेप्रकरणी योग्य निर्णय घेण्याची सूचना सरकारला केली. काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार आणि नाना पटोले यांनी पठाण यांना बिष्णोई टोळीकडून जीवे मारण्याची धमकी आल्याबाबतचा मुद्दा गुरुवारी सभागृहात उपस्थित केला.

पठाण यांच्या सुरक्षेत वाढ करण्याच्या मागणीसाठी काँग्रेस आमदारांनी आक्रमक पवित्रा अवलंबला. आपल्याला या प्रकरणाचे राजकारण करायचे नसून वारंवार मिळणाऱ्या धमक्या गंभीर आहेत, असे पठाण यांनी सांगितले.

# राज्यात बोगस बियाण्यांचा पुरवठा गुजरातमधून : बच्चू कडू यांचा आरोप

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)



**मुंबई** – राज्यात सर्वदूर पाऊस सुरू झाला आहे. तरीही शेतकऱ्यांना अजून खताचा योग्य पुरवठा नाही. बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून राज्यात बोगस बियाण्यांचा सर्वात जास्त पुरवठा गुजरातमधून होत असून गुजरातकडून महाराष्ट्राची लूट चालली असल्याचा गंभीर आरोप बच्चू कडून यांनी विधान परिषदेत लक्षवेधीवर बोलताना केला. सदस्य सदाभाऊ खोत यांनी यंदाच्या खरीप हंगामात राज्यासमोर कमी पावसाचे संकट निर्माण होण्याची शक्यता असून जागतिक परिस्थितीमुळे रासायनिक खतांच्या उपलब्धतेवरही परिणाम होण्याची शक्यता यावर सभागृहाचे लक्ष वेधले होते.

लक्षवेधीला उत्तर देताना राज्यमंत्री आशिष जयस्वाल म्हणाले की, एल निनोच्या प्रभाव सौम्य करण्यासाठी पावसाळ्यापूर्वी जनसंधारणाची कामे युद्धपातळीवर करणे, पीक नियोजनासाठी खतांचा योग्य वापर, अल निनोमुळे उद्भवणारी परिस्थिती हाताळण्यासाठी चारही कृषी विद्यापीठांच्या आपत्कालीन पीक नियोजनाच्या शिफारशी, तसेच ८० ते १०० मिमी पावसानंतरच पेरणी करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत देण्यात आल्या होत्या.

खताबाबत माहिती देताना मंत्री म्हणाले की, राज्याला ४८.८० लाख मे. टन खतांची मंजुरी मिळाली आहे. खरीप हंगामाच्या सुरुवातीला २५.५३ लाख मे. टन खताचा साठा शिल्लक होता, तर जूनअखेर राज्याला एकूण १७.९९ लाख मे. टन खताचा पुरवठा झाला. तसेच ऐन मागणीच्या वेळी पुरवठा व्हावा म्हणून युरिया खताचा १,४१,७९५ मे. टन व डीएपी खताचा १९,०४३ मे. टन संरक्षित खतसाठा करण्यात आल्याचे जयस्वाल म्हणाले.

मंत्र्यांच्या उत्तरावर बोलताना सदाभाऊ खोत म्हणाले की, राज्यात २७ कंपन्यांच्या ३५० जैविक उत्पादनांवर बंदी आहे. मात्र ती खुलेआम बाजारात विकली जात आहेत.

## अमरावती-पुणे रेल्वे प्रवाशांचे हाल वाढणार

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)

**अमरावती** – पुणे स्थानकावरील रेल्वे स्थानकाच्या परिसरातील रुळांच्या आणि सिग्नल यंत्रणेच्या नूतनीकरणाच्या कामाचा मोठा फटका रेल्वे प्रवाशांना बसणार आहे. या तांत्रिक कामामुळे चार जुलै रोजी अमरावती ते पुणे धावणारी गाडी क्रमांक ११४०६ ही गाडी थेट पुणे स्थानकापर्यंत न जाता हडपसर स्थानकापर्यंतच धावणार आहे. पुणे स्थानकातील रुळांच्या रचनेतील 'डीआरएस' क्रमांक २०७ आणि २०८ हे पॉईंट्स बदलण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

# आरटीओला उपप्रादेशिक परिवहन अधिकारी लाभले

*** तीन वर्षांपासुन रिक्त असलेले पद भरले : नंदकिशोर काळे यांनी स्विकारला पदभार**

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)



**अमरावती** – प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ), अमरावती येथे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी पदावर नंदकिशोर काळे यांनी पदभार स्वीकारला आहे. गेल्या तीन वर्षांपासून हे महत्त्वाचे पद रिक्त असल्याने कार्यालयीन कामकाजावर अतिरिक्त ताण पडत होता.

आता या पदावर नियुक्ती झाल्याने प्रशासकीय कामकाजाला अधिक गती मिळणार असून नागरिकांच्या विविध प्रकरणांच्या निपटाऱ्यातही सुलभता येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. काळे हे पुणे येथून पदोन्नतीने उपप्रादेशिक परिवहन अधिकारी म्हणून अमरावती येथे रुजू झाले आहेत. त्यांच्या रुजू होण्याच्या निमित्ताने प्रादेशिक परिवहन कार्यालयात स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रभारी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी संजय पेंढारकर, जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर तसेच कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी पुष्पगुच्छ देऊन काळे यांचे स्वागत केले.

उपस्थितांनी त्यांना नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या अनुभवाचा लाभ अमरावती जिल्ह्यातील परिवहन प्रशासन अधिक सक्षम आणि गतिमान करण्यासाठी होईल, असा विश्वास व्यक्त केला. आरटीओ कार्यालयातील दीर्घकाळ रिक्त असलेले हे पद भरल्यामुळे विभागातील प्रशासकीय समन्वय, अंमलबजावणी आणि नागरिकाभिमुख सेवांना अधिक बळ मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

# राज्यातील महिला समुपदेशन केंद्रांचे सक्षमीकरण करणार : मंत्री आदिती तटकरे

**मानधन आणि अनुदानात वाढीसाठी शासन सकारात्मक**

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)



**मुंबई** – राज्यातील महिला समुपदेशन केंद्रांच्या सक्षमीकरणासाठी आणि तेथील कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी शासन अत्यंत सकारात्मक पावले उचलत आहे.

२०१४ पासून रखडलेली मानधनवाढ आणि गेल्या काही महिन्यांचे थकीत मानधन यावरून विधान परिषदेत आमदार माधवी नाईक यांनी प्रश्न उपस्थित केला त्यावर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी अतिशय दिलासादायक उत्तर दिले. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत लवकरच एक बैठक घेऊन समुपदेशकांच्या मानधनात सन्मानजनक वाढ केली जाईल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

**१३५ महिला समुपदेशन केंद्रे पूर्ण क्षमतेने कार्यरत: मंत्री आदिती तटकरे**

सभागृहात अधिक स्पष्टीकरण देताना मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले कि, अत्याचारग्रस्त महिलांना तात्काळ मानसिक आणि कायदेशीर आधार देण्यासाठी राज्यभरातील पोलीस ठाण्यांच्या आवारात एकूण १४३ समुपदेशन केंद्रांना मान्यता देण्यात आली असून, त्यापैकी १३५ केंद्रे सध्या पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. समुपदेशकांचे मानधन आणि ही केंद्रे चालवणाऱ्या संस्थांच्या प्रशासकीय अनुदानात सन्मानजनक वाढ करण्याबाबतचा एक विशेष प्रस्ताव महिला व बालविकास विभागाने आधीच सकारात्मकतेने तयार केला असून, त्यातील तांत्रिक त्रुटींची पूर्तता करून तो मंजुरीसाठी पुन्हा शासनाकडे सादर केला जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

**सर्व ३५१ तालुक्यांमध्ये केंद्रे सुरू करण्याचा शासनाचा मानस**

मंत्री आदिती तटकरे यांनी पुढे आश्वासन दिले की, कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मानधनाचा प्रश्न तातडीने सोडवला जाईल, तसेच पिंपरी-चिंचवडसह इतर ठिकाणी काही कारणास्तव बंद पडलेली समुपदेशन केंद्रे स्थानिक संस्था आणि समन्वयकांच्या माध्यमातून पुन्हा पूर्ववत सुरू करण्यासाठी विभाग पूर्णपणे सकारात्मक आहे. या योजनेला अधिक बळकटी देण्यासाठी राज्यातील सर्व ३५१ मंत्रालयांतर्गत तालुक्यांमध्ये अशी केंद्रे सुरू करण्याचा विभागाचा मानस आहे. असे सांगत मंत्री आदिती तटकरे यांनी महिलांच्या हितासाठी आणि त्यांच्या पाठीशी उभे राहणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सरकार कटिबद्ध असल्याचा ठाम विश्वास दिला.

# अपक्ष आमदार किरण सरनाईक आता शिवसेनेचे सहयोगी सदस्य

**शिंदेंचे विधान परिषदेतील बळ वाढले : विदर्भातील राजकीय समीकरणांवर होणार परिणाम**

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)



**मुंबई** – विरोधकांना एकामागून एक धक्के देत सत्ताधारी शिवसेनेने विधान परिषदेत पुन्हा एकदा आपली ताकद वाढवली आहे.

अमरावती विभागाचे अपक्ष शिक्षक आमदार किरण सरनाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला जाहीर पाठिंबा दिला असून पक्षाचे सहयोगी सदस्यत्व स्वीकारले आहे. काही दिवसांपूर्वीच उबाठा गटाचे ६ खासदार आणि त्यानंतर विधान परिषदेचे आमदार सचिन अहिर यांनी शिवसेनेत प्रवेश केल्याचा धक्का ताजा असतानाच, आता सरनाईक यांच्या रूपाने विदर्भातील आणखी एक शिलेदार गळाला लावण्यात शिंदेंना यश आले आहे. या नव्या समीकरणामुळे पश्चिम विदर्भातील शिक्षकांच्या राजकारणावर शिवसेनेची पकड मजबूत होणार असून विरोधकांसमोर मात्र मोठे आव्हान उभे राहिले आहे.

आमदार किरण सरनाईक यांचे स्वागत करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मिश्किल टिप्पणी करत विरोधकांना टोला लगावला. शिंदे म्हणाले, 'गेल्या आठवड्यात सहा खासदारांनी पक्षात प्रवेश केला, त्यानंतर सचिन अहिर आपल्यासोबत आले. आमच्याकडे आधीच प्रताप सरनाईक आहेत आणि आता हे दुसरे सरनाईक (किरण सरनाईक) पक्षात येत आहेत. शिक्षक आमदार किरण सरनाईक हे शिवसेनेचे सहयोगी सदस्य म्हणून काम करणार असून, मी त्यांचे पक्षात मनःपूर्वक स्वागत करतो. त्यांच्या येण्याने पक्षाची ताकद नक्कीच वाढेल.'

शिवसेनेचे सहयोगी सदस्यत्व स्वीकारल्यानंतर माध्यमांशी बोलताना किरण सरनाईक म्हणाले, 'राज्याचे तडफफदार नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मला पक्षात मानाचे स्थान दिले आहे. अमरावती विभागातील मतदारसंघाच्या विकासासाठी आणि शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी मला पूर्ण पाठबळ व आधार देण्याचे आश्वासन दिले आहे. या विश्वासाबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.'

# संपादकीय

**{ सकारात्मक विचारांनीच आपले जीवन साकारते. }**

## लोकशाहीचा सन्मान राखत विकासाला प्राधान्य द्या

लोकशाही ही केवळ मतदानाची प्रक्रिया नसून संवाद, संयम, सहकार्य आणि लोकहिताची मूल्यव्यवस्था आहे. मतभेद असणे ही लोकशाहीची नैसर्गिक आणि आवश्यक बाब असली, तरी ते व्यक्त करण्याची पद्धत सभ्य, संयमी आणि विधायक असावी, हीच लोकशाहीची खरी ओळख आहे. जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधी हे केवळ राजकीय पक्षांचे प्रतिनिधी नसून संपूर्ण समाजाचे विश्वासू सेवक असतात. त्यामुळे सभागृहात होणाऱ्या प्रत्येक चर्चेचा केंद्रबिंदू हा जनतेचे प्रश्न आणि शहराचा विकास असायला हवा. दुर्दैवाने अलीकडच्या काळात अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विकासाच्या चर्चेपेक्षा आरोप-प्रत्यारोप, शाब्दिक चकमकी आणि राजकीय संघर्ष यांनाच अधिक महत्त्व मिळताना दिसत आहे. नाशिक महापालिकेच्या सिडको प्रभाग समितीच्या बैठकीत दोन नगरसेवकांमध्ये झालेला वाद ही त्याच प्रवृत्तीची चिंताजनक झलक आहे. नाशिक हे महाराष्ट्रातील वेगाने विकसित होणारे महत्त्वाचे शहर आहे. औद्योगिक, धार्मिक, शैक्षणिक आणि पर्यटनाच्या दृष्टीने शहराचे स्थान विशेष आहे. वाढती लोकसंख्या, विस्तारत चाललेली वसाहती आणि बदलणाऱ्या गरजा लक्षात घेता शहरासमोर अनेक मूलभूत समस्या उभ्या आहेत. रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक कोंडी, अपुरा पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, स्वच्छता, सांडपाणी प्रक्रिया, सार्वजनिक वाहतूक आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या अनेक प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. अशा वेळी महापालिकेच्या बैठका या विकासाचा आराखडा ठरविण्याचे प्रभावी व्यासपीठ ठरायला हव्यात. मात्र त्याच बैठका राजकीय संघर्षाचे मैदान बनू लागल्या, तर त्याचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांनाच बसतो.

लोकप्रतिनिधींनी सभागृहात आपली भूमिका ठामपणे मांडावी, प्रशासनाला जाब विचारावा आणि जनतेच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घ्यावी, यात काहीच गैर नाही. उलट ते त्यांचे कर्तव्यच आहे. परंतु आक्रमकता आणि आक्रमक वर्तन यात मोठा फरक असतो. विचारांची लढाई ही मुद्द्यांवर व्हावी, व्यक्तींवर नव्हे. वैयक्तिक टीका, अपमानास्पद भाषा किंवा गोंधळ घालणे यामुळे लोकशाहीची प्रतिष्ठा कमी होते. अशा घटनांमुळे नागरिकांच्या मनात लोकप्रतिनिधींबद्दलचा विश्वास डळमळीत होतो.

लोकशाहीतील चर्चेची पातळी जितकी उंच असेल, तितकाच प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होतो. नागरिक आपल्या प्रतिनिधींना वैयक्तिक वाद घालण्यासाठी निवडून देत नाहीत. त्यांना अपेक्षा असते की त्यांच्या परिसरातील रस्ते चांगले होतील, पिण्याचे पाणी नियमित मिळेल, कचऱ्याची समस्या सुटेल, सार्वजनिक सुविधा सुधारतील आणि शहराचा सर्वांगीण विकास होईल. निवडणुकीत दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी सर्व पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी परस्पर सहकार्याची भूमिका स्वीकारणे आवश्यक आहे. राजकीय मतभेद कायम राहू शकतात; मात्र विकासाच्या प्रश्नांवर एकमत होणे हीच प्रगल्भ लोकशाहीची खूण आहे.

# बुद्ध पदशिल्प, बुध्दपदकमल, बुध्दपद पादुका...

'गुरुवीन कोण दाखवील वाट' असे भारतीय परंपरेमध्ये प्राचीन काळापासून म्हटले गेले आहे. या जगात बुद्ध हे पहिले जगद्गुरु होते की ज्यांनी आषाढ पौर्णिमेला केलेल्या प्रथम उपदेशामुळे ती पोर्णिमा गुरुपौर्णिमा म्हणून ओळखली जाऊ लागली.

गुरूंच्या निर्वाणानंतर त्यांची पोकळी जाणवू नये यासाठी गुरूंच्या वस्तू सांभाळणे व त्यांची आठवण म्हणून त्या पूजने ही भारतीय परंपरा होती. त्याचप्रमाणे बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांचे अस्थिधातूवर स्तूप उभारले गेले. सम्राट अशोकाच्या काळापासून धम्माचा प्रसार चोहीकडे झाल्यावर स्तुपाबरोबर बुद्ध शिल्प, त्रिरत्न, बोधिवृक्ष, रिक्त सिंहासन, कमलपुष्प, पदकमल अशी रूपके-चिन्हे शिल्पांकीत करून त्यांना मनोभावे वंदन करण्यात येऊ लागले. त्यापैकी बुद्ध प्रतिमा शिल्प आणि पदकमल प्रतिमा शिल्प भारतखंडात अत्यंत लोकप्रिय झाले. पदकमलावर टाच व तळवे यांचेवर धम्मचक्र, स्वस्तिक (अनुलोम-प्रतिलोम), शंख, धम्मचक्र, घंटा, त्रिरत्न, कलश, कमलपुष्प, मासा, हत्ती, सिंह इ. शुभचिन्हे असतात.

जगात पहिल्यांदाच ज्या महामानवाचे पदकमल शिल्प तयार करण्यात आले ती व्यक्ती म्हणजे



भगवान बुद्धच होते.

त्यांचे अस्तित्वच या पदकमलातून लोकांना जाणवू लागले. राजपुत्र असून देखील सर्व सुखांचा त्याग करून संन्यस्त मार्ग स्वीकारणे सोपे नव्हते. समस्त मानवजातीप्रती करुणा निर्माण होऊन दुःखमुक्तीचा मार्ग शोधणे आणि तो सर्वाना उपदेशीणे हे अदभुत होते. यामुळेच बुद्ध तत्वज्ञान दिवसेंदिवस स्वीकारले जात आहे. व त्यांच्या रुपकांना वंदन केले जात आहे.

'बुद्ध पदशिल्प' म्हणजेच भगवान बुद्ध यांच्या पावलांची पूजनीय प्रतिमा. ही वालुकामय पाषाणावर, खडकावरती मोठ्या शिळेवर अशा असंख्य ठिकाणी कोरली गेली. भगवान बुद्धांच्या पावलांचा तो ठसा नसला तरी मानवजातीस त्यांनी दाखविलेला दुःखमुक्तीचा मार्ग म्हणून यांच्याप्रती ती श्रद्धा होती. म्हणूनच आदरार्थ भावनेतून पदकमल शिल्पांचा उदय होत गेला व लेण्यांमधून, चैत्यगृहातून, विहारातून ती दृष्टीस पडू लागली. ही प्रथा पूर्वेकडील बौद्ध देश जपान, थाई, बर्मा, कंबोडिया, व्हिएतनाम, लाओस आणि दक्षिणेकडे सिरिलंकेत सुद्धा पसरली. विविध पदकमल शिल्पे हेच सांगतात की या पृथ्वीतलावर एकेकाळी बुद्ध यांचे वास्तव्य होते.

काही ठिकाणी ही पदशिल्पे साकारताना ३२ लक्षणांची रूपके-चिन्हे सुद्धा पावलांच्या तळव्यावर कोरली जाऊ लागली. श्रीलंकेत 'सिरी पदया' नावाचा मोठा पर्वतच आहे.

तेथे बुद्ध पदकमले कोरण्यात आली असून असंख्य भाविक आणि पर्यटक तेथे दर्शनार्थ जात असतात.

जगात वेगवेगळ्या कालावधीत अनेक देशात बुद्ध पदकमल शिल्पे तयार करण्यात आली. जपानी लेखक 'मोटोजी निवा' यांनी याबाबत अभ्यास केला आणि आशिया देशातील अनेक बुद्ध पदशिल्पांचा शोध घेतला. तेंव्हा त्यांना तीन हजाराच्यावर बुद्ध पदशिल्पे आढळली. जपानमध्ये तीनशेच्यावर तर सिरीलंकेत एक हजारच्या वर पदकमल शिल्पे आहेत. प्रत्येक पदकमलावर धम्मचक्र अंकित केल्याचे त्यांना आढळून आले. चीनमध्ये चँग राजवटीत मोठी बुद्ध पदशिल्पे उत्खननात मिळाली तेव्हा तेथील राजकुमारीने इसवी सन ७०१ पासून नवीन शक सुरू केले.

आतापर्यंत पदशिल्पे अफगाणिस्तान, भूतान, कोरिया, मलेशिया, मालदीव, पाकिस्तान, सिंगापूर, थायलंड येथे प्राप्त झाली आहेत. भारतात बिहार, उत्तरप्रदेश, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश आणि तामिळनाडूत बुद्ध पदकमल शिल्पे मिळाली आहेत. अलीकडेच फेब्रुवारी २०१७ मध्ये छत्तीसगढ राज्यातील बिलासपूर जिल्ह्यातील डमरू गावात वोटीव स्तूप आणि बुद्धपद शिल्प मिळाले. हे वाहून नेण्याजोगे असून त्यावर १२ कमलपुष्प कोरले आहेत.

बुद्ध पदकमल शिल्पांचा विषय मोठा व गहन आहे. त्यावर प्रबंध लिहिला जाऊ शकेल. जाणकारांनी त्याचा जरूर अभ्यास करावा. आता आषाडी देहू आळंदी ते पंढरपूर यात्रा सुरु होतील. संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज यांच्या पालखीमध्ये पदकलम ठेवून त्यांची मनोभावे पूजा केली जाते. देहू, आलंकापूरी म्हणजे आळंदी, पंढरपूर ही प्राचिन बौध्द स्थळे होती.

आषाढी कार्तिकी यात्रा म्हणजे बौध्द परंपराच होय. हल्लीच्या थातुरमातुर बाबा, गुरूंच्या पादुकांचे दर्शन घेण्यापरीस तथागत भगवान गौतम बुध्दांनी दाखविलेल्या सध्दर्माच्या मार्गावर मार्गावर एकतरी पाऊल पुढे टाकावे.

# भूकंपापेक्षा निष्काळजीपणा जास्त विनाशकारी

निसर्गाच्या अनाकलनीय आणि रौद्र रूपाची प्रचिती पुन्हा एकदा जगाला आली आहे. दक्षिण अमेरिकेतील व्हेनेझुएला या देशाला लागोपाठ बसलेल्या दोन शक्तीशाली भूकंपाच्या धक्क्यांनी संपूर्ण देश हादरवून सोडला आहे. ७.२ आणि ७.५ रिश्टर स्केल तीव्रतेच्या या भूकंपांनी काही सेकंदांमध्येच अनेक शहरांचे रूपांतर ढिगाऱ्यात केले. संध्याकाळच्या गजबजलेल्या वेळी आलेल्या या आपत्तीमुळे लोकांना सावरण्याची संधीच मिळाली नाही. उंच इमारती पत्त्याच्या बंगल्यासारख्या



कोसळल्या, रस्ते दुभंगले आणि वीज, पाणी तसेच दळणवळणाची साधने क्षणात नष्ट झाली. व्हेनेझुएलातील हा हाहाकार केवळ त्या देशापुरता मर्यादित नसून, संपूर्ण जगाला एका मोठ्या धोक्याची जाणीव करून देणारा आहे. दर वेळी अशा प्रकारची मोठी आपत्ती येते, हजारो लोकांचा बळी जातो, अब्जावधी रुपयांचे नुकसान होते आणि त्यानंतर काही काळ चर्चा करून जग पुन्हा जुन्याच पद्धतीने जगू लागते.

निसर्गाच्या या इशाऱ्याकडे सातत्याने होणारे दुर्लक्ष मानवासाठी किती महाग पडू शकते, याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे व्हेनेझुएलातील सद्यस्थिती. भूकंप कोणतीही पूर्वसूचना देऊन येत नाही. या जागतिक संदर्भांचा विचार करताना भारताला, विशेषतः महाराष्ट्राला लागलेला किल्लारी (लातूर) भूकंपाचा डाग विसरता येत नाही. ३० सप्टेंबर १९९३ रोजी झालेला किल्लारीचा भूकंप हा स्वतंत्र भारताच्या इतिहासातील सर्वात भीषण भूकंपांपैकी एक होता. तो दिवस गणेशोत्सवाच्या सांगतेचा म्हणजेच अनंत चतुर्दशीचा होता. रात्री उशिरापर्यंत चाललेल्या विसर्जन मिरवणुकांनंतर लोक गाढ झोपेत होते. पहाटेच्या सुमारास अचानक जमिनीच्या पोटातील एका मोठ्या आवाजाने आणि हादऱ्याने ५२ गावांचे अस्तित्वच मिटवून टाकले. ६.२ रिश्टर स्केल तीव्रतेचा हा भूकंप भूगर्भशास्त्रज्ञांसाठी एक मोठे कोडे ठरला होता. कारण तोपर्यंत दख्खनचे पठार किंवा मध्य भारत भूकंपाच्या दृष्टीने अत्यंत सुरक्षित आणि स्थिर मानला जात होता. तिथे एवढा मोठा भूकंप होऊ शकतो, यावर आधी कोणाचा विश्वासच बसत नव्हता. किल्लारीच्या भूकंपात साधारण दहा हजार लोकांचा मृत्यू झाला होता. या मृत्यूंचे सर्वात मोठे कारण म्हणजे तिथल्या घरांची रचना होती. मराठवाड्यातील ग्रामीण भागात प्रामुख्याने माती आणि जड दगडांची मोठी घरे असायची.

# इथेनॉल धोरणाबाबत नागरिकांचे प्रश्न

'हरित इंधन' म्हणून सादर केलेले हे धोरण इतिहासात पर्यावरणपूरक उपक्रम म्हणून नव्हे, तर सर्वसामान्य वाहनधारकांवर पुरेशा तयारीशिवाय लादलेला आणखी एक महागडा प्रयोग म्हणून नोंदले जाण्याचा धोका नाकारता येणार नाही.

२०१४ साली नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार केंद्रात सत्तेत आल्यानंतर राष्ट्रहित, आत्मनिर्भरता आणि विकासाच्या नावाखाली कोणताही सारासार विचार न करता, होणाऱ्या परिणामाची पर्वा न करता अनेक मोठमोठे निर्णय घेतले. नोटाबंदी, घाईघाईने लागू केलेला जीएसटी, कोरोनाकाळातील अचानक लावलेला लॉकडाऊन, शेतकरीविरोधी तीन कृषी कायदे अशा अनेक निर्णयांचे दुष्परिणाम देशाने प्रत्यक्ष अनुभवले. प्रत्येक वेळी सरकारने मोठी आश्वासने दिली; परंतु त्याची किंमत सामान्य नागरिकांनाच मोजावी लागली. आता पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्याच्या धोरणावरही तशाच प्रकारचे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. हा निर्णय खरोखर ऊर्जा स्वावलंबनासाठी आहे की पुन्हा एकदा पुरेशी तयारी न करता जनतेवर लादलेला प्रयोग? याची चर्चा जनमानसात सुरू असतानाच केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी ए८५, ए१०० आणण्याची घोषणा केली आहे.

तक्रारींची दखल घेणार का? इथेनॉल मिश्रित इंधनाबाबत सरकारचा दावा आकर्षक आहे. कच्च्या तेलावरील आयात कमी होईल, परकीय चलनाची बचत होईल, पर्यावरणाचे संरक्षण होईल आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल. कागदावर हे सर्व आदर्श वाटते. पण सार्वजनिक धोरणांचे मूल्यांकन घोषणांवर होत नाही; ते नागरिकांच्या अनुभवांवर होते आणि आज वाहनधारकांचा अनुभव सरकारच्या दाव्यांशी जुळताना दिसत नाही. देशभरातून हजारो लाखो वाहनधारक कमी मायलेज, इंजिनची कार्यक्षमता घटणे, पिकअप कमी होणे, वारंवार इंजिनमध्ये बिघाड होणे आणि देखभाल खर्च वाढल्याच्या तक्रारी करत आहेत. सोशल मीडियावरील प्रत्येक दावा अंतिम पुरावा नसला, तरी देशभरातून एकाच प्रकारच्या तक्रारी सातत्याने येत असतील, तर त्याकडे अपवाद म्हणून पाहून दुर्लक्ष करणे धोकादायक ठरते.

इथेनॉलचे प्रमाण वाढल्यानंतर काही वाहनांमध्ये फ्युएल पंप, फ्युएल इंजेक्टर, फिल्टर, रबर सील, होज पाइप




आणि सेन्सर यांच्याशी संबंधित बिघाड वाढल्याचे अनेक मेकॅनिक, ऑटोमोबाईल अभियंते आणि स्पेअर पार्ट्स विक्रेते सांगतात. जुन्या वाहनांमध्ये या समस्या मोठ्या प्रमाणात आहेत. या तक्रारी वैज्ञानिकदृष्ट्या पडताळून त्याचे निष्कर्ष सार्वजनिक केले पाहिजेत.

देश ए२० साठी तयार आहे का? देशातील सर्व वाहने ए२० इंधनासाठी खरोखर तयार आहेत का? या प्रश्नांचे उत्तर नाही असे आहे. देशात २०२३ सालापासून ए२० इंधनाशी अनुकूल वाहने तयार होऊन विक्री करण्यास सुरुवात झाली. त्यामुळे त्यापूर्वीची कोट्यवधी दुचाकी आणि चारचाकी वाहनांची रचना पूर्णपणे ए२० इंधनाशी सुसंगत नाही. अनेक वाहन उत्पादकांनी स्वतः काही जुन्या मॉडेल्सबाबत सावधगिरीचा सल्ला दिला आहे. मग अशा वाहनांचे नुकसान झाल्यास जबाबदारी कोण स्वीकारणार? सरकार? तेल कंपन्या? की वाहन उत्पादक? की पुन्हा एकदा सामान्य नागरिकच? १ लिटर इथेनॉलसाठी किती पाणी लागते? इथेनॉलचे समर्थन करताना शेतकऱ्यांचा मुद्दा पुढे केला जातो. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले पाहिजे, याबाबत कोणाचाही विरोध नाही. पण इथेनॉल उत्पादनाच्या संदर्भातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पाण्याचा प्रचंड वापर. नीती आयोग आणि पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने तयार केलेल्या 'रोडमॅप फॉर इथेनॉल ब्लेंडिंग इन इंडिया' या अहवालानुसार, उसापासून १ लिटर इथेनॉल तयार करण्यासाठी साधारण ३,००० लिटर पाणी लागते.

तांदळाच्या बाबतीत ही स्थिती आणखी गंभीर असून, १ किलो तांदूळ पिकवण्यासाठी सुमारे ४,००० लिटर पाणी लागते. एका लिटर इथेनॉलसाठी सुमारे २.५ ते ३ किलो तांदळाची आवश्यकता असल्याने त्यासाठी १०,००० लिटरहून अधिक पाणी खर्च होते. धान्य पिकांमध्ये मका तुलनेने कमी पाणी लागणारे पीक मानले जात असले, तरी प्रति एकर इथेनॉल उत्पादन तांदळाच्या तुलनेत कमी आहे. दुष्काळ आणि भूजल पातळी सातत्याने घटत असणाऱ्या भारतात, जिथे आजही ८० कोटी लोक आजही सरकारकडून मिळणाऱ्या मोफत धान्यावर अवलंबून आहेत. त्या देशात ऊर्जा स्वावलंबनाच्या उद्दिष्टांसोबतच जलसंपत्तीचे संवर्धन आणि १४० कोटी जनतेच्या अन्नसुरक्षेचा समतोल राखणे हेही महत्त्वाचे आहे.

सरकारची बचत जनतेचा तोटा सरकार परकीय चलन बचतीचा दावा करते. पण दुसऱ्या बाजूला वाहनधारकांचे मायलेज कमी होत असेल, वाहनांच्या दुरुस्तीचा खर्च वाढत असेल आणि देखभालीवर हजारो रुपये खर्च करावे लागत असतील, तर या धोरणाचा निव्वळ आर्थिक परिणाम काय आहे? २० रुपये लिटरने मिळणारे इथेनॉल पेट्रोलमध्ये मिसळून नागरिकांना ११२ रुपये लिटर का विकले जात आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# राम मंदिर देणगी घोटाळा : शिक्षकाच्या घरातून परदेशी चलन जप्त

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

***लखनऊ*** – अयोध्या येथील प्रभू श्री राम मंदिर देणगी चोरी प्रकरणातील संशयित आरोपी, एका प्राथमिक शिक्षकाच्या घरातून २० लाख रुपयांची रोकड, परदेशी चलन आणि दागिने जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे 'श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट'च्या कारभारावर आणि सध्या सुरू असलेल्या पोलीस तपासावर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संपूर्ण वादाच्या केंद्रस्थानी अविनाश शुक्ला हा संशयित आरोपी आहे. तो राम मंदिराच्या देणगी मोजणी विभागात कार्यरत होता. एका सामान्य उत्पन्नाच्या व्यक्तीने अवघ्या काही महिन्यांत एवढी अफाट संपत्ती कशी गोळा केली, याचा शोध आता तपास यंत्रणा घेत आहेत.

२० लाखांची रोकड अयोध्येतील 'श्याम साधन योग केंद्र'शी संबंधित लोकांच्या मते, अविनाशची पार्श्वभूमी अत्यंत सर्वसामान्य आहे. तो एका प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून काम करत असून त्याचा मासिक पगार केवळ १४,००० ते १५,००० रुपये होता. या वर्षाच्या मार्च महिन्यात राम मंदिराच्या देणगी मोजणी विभागात रुजू होण्यापूर्वी तो हनुमान गुहेजवळ पाणी विकण्याचे काम करायचा.

प्रत्यक्षदर्शींचा दावा या प्रकरणातील मुख्य साक्षीदार सेवादार सुंदरलाल यांनी सांगितले की, ५ जून रोजी चार पोलीस कर्मचारी आणि ट्रस्टशी संबंधित काही लोक अविनाशला कौशालपुरी येथील



'श्याम साधन योग केंद्रा'तील त्याच्या खोलीवर घेऊन आले होते.नंतर त्यांना समजले की अविनाशकडून सुमारे २० लाख रुपये जप्त करण्यात आले आहेत. ट्रस्टची महत्त्वाची बैठक आगामी ६ जुलै रोजी 'श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट'च्या १५ सदस्यीय समितीची एक महत्त्वाची बैठक होणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या बैठकीत ट्रस्टची पुनर्रचना करणे, संतांचे प्रतिनिधित्व वाढवणे आणि काही ठरावीक पदाधिकाऱ्यांच्या अधिकार व जबाबदाऱ्यांचा आढावा घेण्यावर चर्चा होण्याची शक्यता आहे.

याशिवाय, गोपाल राव यांच्यासह काही प्रमुख कार्यकर्त्यांच्या भविष्यातील भूमिकेवरही या बैठकीत निर्णय घेतला जाऊ शकतो.

# शेतीकामासाठी गाळ, मुरुमावरील रॉयल्टी रद्द! विहीर, गोठ्यासाठी गौण खनिज मोफत : चंद्रशेखर बावनकुळे

**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**

***मुंबई*** – बळीराजाला आता स्वतःच्या शेती सुधारणेसाठी, विहीर, गोठा किंवा शेतघर बांधण्यासाठी लागणाऱ्या माती आणि मुरुमासारख्या गौण खनिजांसाठी शासनाला एक रुपयाचीही रॉयल्टी द्यावी लागणार नाही.



बळीराजाला आता स्वतःच्या शेती सुधारणेसाठी, विहीर, गोठा किंवा शेतघर बांधण्यासाठी लागणाऱ्या माती आणि मुरुमासारख्या गौण खनिजांसाठी शासनाला एक रुपयाचीही रॉयल्टी (स्वामित्व धन) द्यावी लागणार नाही. इतकेच नव्हे, तर शेतकऱ्यांच्या मालकीचे ट्रॅक्टर किंवा बैलगाड्या अडवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणाऱ्या पोलीस किंवा महसूल अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

गुरुवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत केलेल्या घोषणेनंतर लगेच याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी स्वतःच्या वापरासाठी माती-मुरूम नेल्यास ट्रॅक्टर, ट्रक किंवा बैलगाडी कुठलेही तहसीलदार किंवा पोलीस पकडणार नाहीत. त्यांच्यावर कोणतीही दंडात्मक कारवाई केली जाणार नाही. कोणत्याही अधिकाऱ्याने शेतकऱ्याला नाहक त्रास दिला, तर सरकार त्यांच्यावर कठोर पावले उचलेल. व्यावसायिक वापर आढळल्यास मात्र कारवाई केली जाईल.

अधिकाऱ्यांकडून १५ दिवसांत परवानगी बंधनकारक शेतकऱ्यांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत म्हणून प्रक्रियेचे सुलभीकरण करण्यात आले आहे. शेतकऱ्याला केवळ स्थानिक तलाठ्याकडे एक साधा अर्ज करावा लागेल.

संबंधित मंडळ अधिकाऱ्याने अर्जावर १५ दिवसांच्या आत परवानगी देणे बंधनकारक करण्यात आले आहे. तलाव किंवा नाले जलसंधारण विभागाचे असतील तर त्या विभागाचे आणि महसुली नाले असल्यास तहसीलदारांचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल.

## मोफत तिकीट देण्यावरुन बसमध्येच तुफान राडा, कंडक्टरला जबर मारहाण : एसटी कर्मचाऱ्यांचा ठिय्या



**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

***हिंगोली*** – शासनाने विविध नागरिकांसाठी प्रवासात सवलत दिली असून काहींना मोफत प्रवास देण्यात येत आहे. मात्र, हिंगोली शहरातील बसस्थानकात आज मोफत तिकीट देण्याच्या कारणावरून प्रवाशाचा वाद झाला. प्रवाशाने आपल्या साथीदारासह वाहकाला बेदम मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बसमधील काही प्रवाशांनी एसटी बसच्या वाहकावर धारदार शस्त्र आणि पंचने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात वाहक गंभीर जखमी झाला असून संपूर्ण प्रकार मोबाईल कॅमेऱ्यात कैद झाला आहे. घटनेनंतर संतप्त झालेल्या एसटी कर्मचाऱ्यांनी आरोपींना तातडीने अटक करण्याच्या मागणीसाठी बससेवा बंद ठेवत कामबंद आंदोलन सुरू केले. आपल्या नियोजित बसची फेरी पूर्ण करुन एक एसटी बस हिंगोली बसस्थानकात दाखल होत असताना मोफत तिकीट देण्याच्या कारणावरून वाद झाला आहे. संबंधित प्रवासी शासनाने निश्चित केलेल्या पात्रतेच्या निकषात बसत नसल्याने वाहकाने मोफत तिकीट देण्यास नकार दिला. याच कारणावरून बसमध्ये प्रवासी आणि वाहकामध्ये शाब्दिक वाद झाला.

गंगुबाई नामदेवराव शेरेकर विद्यालय तिवसाघाट येथे

## नवागत प्रवेशित विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव उत्साह

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

***वरुड*** – दोन महिन्याच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर मंगळवारी शैक्षणिक सत्र २०२६-२७ च्या शुभारंभ प्रसंगी मंगलमूर्ती शिक्षण संस्थेद्वारा संचालित गंगुबाई नामदेवराव शेरेकर विद्यालय तिवसाघाट येथे नवागत प्रवेशित विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव उत्साह संपन्न झाला.

यावेळी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शालेय पाठ्यपुस्तके व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले या सोहळ्याला पोलीस पाटील छाया झेले, शाळा समिती अध्यक्ष हिरामण उईके व पालक प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून मुख्याध्यापक



सुधीर श्रीराव यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी शिक्षक सतीश नेरकर, ममता खासबागे, कुमुद भोरकर व शिक्षकेत्तर कर्मचारी हितेंद्र देसली, हेमंत चौकडे, लक्ष्मीकांत बिलथरीया उपस्थित होते.

# माहिती अधिकारातील नव्या नियमांना स्थगिती

## कार्यकर्त्यांच्या आक्षेपामुळे सरकारचा निर्णय, फडणवीसांचे माहिती आयोगाला पत्र

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

**मुंबई** – महाराष्ट्र सरकारकडून नुकत्याच अधिसूचित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २०२६' ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिली आहे. माहिती अधिकाराच्या अर्जासाठी वाढीव शुल्क आणि ओळखपत्राची अनिवार्य अट यांसारख्या नवीन नियमांना अनेक कार्यकर्त्यांनी विरोध केला होता.



यासंदर्भात फडणवीस यांनी राज्य माहिती आयोगाला पत्र पाठवले आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांच्याशी या संदर्भात सविस्तर चर्चा केल्याशिवाय माहिती अधिकार कायद्यात कोणताही बदल करणे किंवा निर्णय घेणे उचित ठरणार नाही, असे फडणवीस यांनी राज्याच्या मुख्य माहिती आयुक्तांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे. मुख्यमंत्र्यांच्या या सूचनेनंतर मुख्य माहिती आयुक्तांनी १२ जून २०२६ रोजी महाराष्ट्र माहिती अधिकार कायद्याबाबत राजपत्रात प्रकाशित केलेल्या सर्व बदलांना स्थगिती दिली आहे. या अधिसूचनेनुसार माहिती अर्जाचे शुल्क १० रुपयांवरून ३० रुपये करण्यात आले होते. प्रथम अपिलासाठी ५० रुपये तर द्वितीय अपिलासाठी १०० रुपये शुल्क आकारण्याची तरतूद करण्यात आली होती. एका अर्जात एकाच विषयाची माहिती मागण्याचे बंधन घालताना १५० शब्दांची मर्यादा घालण्यात आली होती. अर्जात माहिती मागण्याचे कारण द्यावे लागणार होते. या निर्णयावर टीका झाल्यानंतर कारण देण्याची तरतूद काढून टाकण्यात आली होती. हे नवीन नियम माहिती अधिकाराचा मूळ उद्देशच मोडीत काढणारे आहेत, असा कार्यकर्त्यांचा आक्षेप होता.

# २३ वर्षीय कामगाराचा गाढ झोपेतच मृत्यू

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

***पुणे*** – दौंड तालुक्यातील खामगाव येथील एक खळबळजनक आणि तितकाच क्रूर प्रकार यवत पोलिसांच्या तपासात उघडकीस आला आहे. एका २३ वर्षीय मजुराचा जेसीबीखाली चिरडून मृत्यू झाल्यानंतर, हा गुन्हा दडपण्यासाठी आरोपींनी त्याचा मृतदेह कारमधून नेऊन वाघोली-राहू रस्त्यावर फेकून दिला. हा केवळ एक रस्ते अपघात असल्याचा बनाव आरोपींनी रचला होता, मात्र पोलिसांच्या चौकशीत हा



सगळा कट उघड झाला आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुऱ्हाळ मालक, जेसीबी चालक आणि मालकासह पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. रामू शंभू पासी हा तरुण एप्रिल २०२६ पासून खामगाव येथील 'गाडीमोड' परिसरातील एका गुऱ्हाळावर मजूर म्हणून काम करत होता. १९ जूनच्या मध्यरात्री गुऱ्हाळावर जेसीबीचे काम सुरू होते. यावेळी चालक आलम याने निष्काळजीपणाने जेसीबी चालवला, ज्यामुळे तिथे झोपलेल्या रामू पासीच्या अंगावरून थेट जेसीबी गेला. या भीषण दुर्घटनेत रामूचा जागीच मृत्यू झाला. पुरावा नष्ट करण्यासाठी धमकी आणि मृतदेहाची विल्हेवाट अपघातानंतर पोलिसांना कळवण्याऐवजी आरोपींनी गुन्हा लपवण्याचा कट रचला.

नगर परिषद सावता विद्यामंदिर येथे

# शाळा प्रवेशोत्सव दिन उत्साहात साजरा

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

***वरुड*** – न.प.सावता विद्यामंदिर येथील शाळेत शाळेच्या शुभारंभ दिनी प्रवेश-ोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.सकाळी शाळेच्या वतीने प्रभातफेरी काढण्यात आली.

मान्यवरांचे हस्ते विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन प्रसिद्ध शल्य चिकित्सक डॉ.सुधाकर बंदे तर प्रमुख पाहुणे म्हणुन न.प.शिक्षण सभापती



अॅड.प्राजक्ता चौधरी, बाल रोग तज्ञ डॉ.प्रविण चौधरी, नगरसेवक योगेश्वर खासबागे, नगरसेविका भारती माळोदे उपस्थित होत्या.

मान्यवरांनी पुष्पवृष्टी करुन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक श.शि.निकम यांनी केले. मान्यवरांनी विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला बहुसंख्येने पालक उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन फराटे तर आभार पुजा गणोरकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कॉन्व्हेट शिक्षिका सुजाता दुपारे, रुपाली वानखडे, कर्मचारी प्रभाकर वानखडे, सुरेखा यावले, अश्विनी खासबागे यांनी परिश्रम घेतले.

डॉ. मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थ्यांचा जल्लोषात प्रवेशोत्सव

# शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत

**(प्रतिनीधी वरुड दर्पण)**

**वरुड** – स्थानिक नवयुवक शिक्षण संस्था अंतर्गत डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथे २०२६- २७ या शैक्षणिक सत्रात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे जल्लोषात उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांमध्ये उत्साह दिसून आला.



याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका नीता चिमोटे व आदर्श प्रायमरी मराठी शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण शेळके तसेच सर्व शिक्षिका यांनी विद्यार्थ्यांचे औक्षण करुन गुलाब पाकळ्यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. शाळेच्या मुख्यध्यपिका यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन या शैक्षणिक सत्राविषयी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विद्यार्थ्यांना चॉकलेट वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सेल्फी स्टॅन्डमधे विद्यार्थ्यांनी फोटो काढून आपला आनंद द्विगुणित केला. शाळेची सजावट व त्यांच्यासाठी असलेल्या ऍक्टिव्हिटी पाहून विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण झाला. शाळेचा पहिला दिवस विद्यार्थी, पालक व शिक्षक वृंद यांच्यासाठी अविस्मरणीय व आनंददायी ठरला.

# सरकारी रक्त पिशव्या खासगी बँकेकडे वळवल्या

**२ माजी कंत्राटी कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल**

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**मुंबई** - अन्न व औषध प्रशासन आणि राज्य रक्त संक्रमण परिषद यांच्या चौकशीतून सर जे.जे.महानगर रक्तपेढीच्या कारभारातील गंभीर गैरव्यवहार समोर आले आहेत. सध्याच्या विधानसभा अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित झाल्यानंतर महाराष्ट्र सरकारच्या आदेशानुसार, सार्वजनिक आरोग्य विभागाचे उपसंचालक (निरीक्षण व मूल्यमापन) तथा 'एसबीटीसी'चे अतिरिक्त सहाय्यक संचालक डॉ.सुहास मोहनलकर यांनी दोन माजी कंत्राटी कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. कंत्राटी वैद्यकीय संचालक डॉ.हितेश पगारे आणि कंत्राटी वैद्यकीय सामाजिक अधिकारी अजय भिसे यांनी सरकारी रक्तदानाचा छावण्यांमधून गोळा केलेल्या रक्ताच्या पिशव्या बदलापूर येथील 'माया ब्लड सेंटर' या खासगी रक्तपेढीकडे वळवल्याचा आरोप आहे.

यामुळे सरकारचे आर्थिक नुकसान झाले असून सार्वजनिक रक्त संकलन व्यवस्थेच्या विश्वासार्हतेला तडा गेला आहे.

# बदलापूर महानगरपालिका कधी? आमदार किसन कथोरे यांची विधानसभेत मागणी

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*




**बदलापूर** - ठाणे जिल्ह्यातील कुळगाव-बदलापूर नगरपरिषद क्षेत्रात झपाट्याने होत असलेले शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता, कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेचे रूपांतर स्वतंत्र महानगरपालिकेत करण्यात यावे, अशी मागणी मुरबाडचे आमदार किसन कथोरे यांनी महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात केली. औचित्याच्या मुद्द्याद्वारे त्यांनी सभागृहाचे आणि राज्य शासनाचे लक्ष या महत्त्वाच्या विषयाकडे वेधले. त्यांच्या या मागणीनंतर पुन्हा एकदा बदलापूरची स्वतंत्र महानगरपालिका होणार की अंबरनाथ-बदलापूरची संयुक्त महानगरपालिका स्थापन होणार, याविषयीच्या चर्चांना वेग आला आहे. अंबरनाथ आणि बदलापूर यांच्या संयुक्त महानगरपालिकेचा मुद्दा गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. मात्र, बदलापूरची अंबरनाथसोबत संयुक्त महानगरपालिका नको, तर स्वतंत्र महानगरपालिका व्हावी, अशी भूमिका आमदार किसन कथोरे यांनी गेल्या दशकभरापासून सातत्याने मांडली आहे. सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनातही त्यांनी हा मुद्दा पुन्हा एकदा सभागृहात उपस्थित केला. कुळगाव-बदलापूर शहराचा विस्तार अत्यंत वेगाने होत असून वाढत्या लोकसंख्येमुळे शहराचा विकास परिसरातील ग्रामपंचायतींच्या हद्दीकडे झपाट्याने होत आहे.

# बोगस कॉल सेंटर उद्ध्वस्त ११ जणांना अटक

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*




**मुंबई**- विमान कंपनीत (एअरलाइन) नोकरी लावण्याचे आमिष दाखवून तरुणांची फसवणूक करणाऱ्या एका आंतरराज्य टोळीचा मुंबई पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी थेट उत्तराखंडची राजधानी डेहराडून येथे छापा टाकून एका बोगस कॉल सेंटरचा थरारक पद्धतीने भंडाफोड केला. या कारवाईत पोलिसांनी ११ जणांना बेड्या ठोकल्या आहेत.

मुंबईतील मानखुर्द परिसरातील एका महिलेने यासंदर्भात पोलिसांत तक्रार दाखल केली होती. जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात काही अज्ञात व्यक्तींनी तिला एका नामांकित खासगी विमान कंपनीत नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवले होते. भरती प्रक्रियेच्या नावाखाली आरोपींनी तिला वेगवेगळ्या बँक खात्यांवर सुमारे २.५ लाख रुपये वर्ग करण्यास भाग पाडले. मात्र, पैसे भरल्यानंतरही नोकरी मिळाली नाही आणि आरोपींनी संपर्क साधणेही बंद केले.

# 'त्या' दोन अधिकाऱ्यांचे तडकाफडकी निलंबन

**महिलेच्या मृत्यूप्रकरणी आयुक्तांची कारवाई**

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*





**नवी मुंबई** - कर्तव्यात कसूर, हलगर्जीपणा आणि निष्काळजीपणा केल्याप्रकरणी नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांना तडकाफडकी निलंबित केले आहे.

नेरूळ एलपी परिसरातील विद्युत केबल शॉर्टसर्किट दुर्घटनाप्रकरणी कार्यकारी अभियंता प्रवीण गाडे, तर ऐरोली येथील राजमाता जिजाऊ सार्वजनिक रुग्णालयातील गर्भवती महिलेच्या मृत्यू प्रकरणी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.भावना पगारे यांच्यावर २ जुलै रोजी निलंबनाची कारवाई करण्यात आली. मनसेच्या आक्रमक अर्धनग्न ठिय्या आंदोलनानंतर महापालिका प्रशासनाने ही कठोर कारवाई केल्याने महापालिका वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. नेरूळ येथे १ जुलै रोजी पावसाच्या पाण्यात विद्युत केबलचा संपर्क आल्याने दोन विद्यार्थिनींना विजेचा तीव्र धक्का बसला होता. या घटनेत प्रथमदर्शनी कार्यकारी अभियंता प्रवीण गाडे यांचा हलगर्जीपणा आढळून आल्याने महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली.

# एकाच आठवड्यात दोन महिलांचा बळी

**गादा-घोरपड रोडवर महिलेचा संशयास्पद मृत्यू दुसऱ्या पतीवर संशय**

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**नागपूर** - नागपूर शहरातून एक खळबळजनक घटना समोर आली आहे. यात कामठी मधील गादा-घोरपड रोडवर काल (२ जुलै) रात्री एका महिलेचा मृतदेह आढळून आल्याची माहिती मिळाली.

माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अधिक तपास सुरू केला असता मृत महिलेची ओळख पटली आहे. यात भाग्यश्री राजेंद्र कोठरंगे (वय ४०) या मृत अवस्थेत आढळून आल्या आहेत. भाग्यश्रीवर कोणीतरी अज्ञात व्यक्तीने कुऱ्हाडी सारख्या धारदार शस्त्राने अनेक वार केल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात दिसून आले आहे. पोलिसांनी त्यांच्या बहिणींना बोलून मृतदेहाची ओळख पटविली असून सध्या पोलीस अधिक तपास करत आहे.

दुसरा पती पैशांच्या कारणावरून मानसिक व शारीरिक छळ करत असल्याचा आरोप दरम्यान, नातेवाईकांकडून पोलिसांना मिळालेल्या माहितीप्रमाणे, भाग्यश्री नागपूरच्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयात स्वच्छता कर्मचारी म्हणून कार्यरत होत्या. तर कुटुंबीयांच्या माहितीनुसार, भाग्यश्री यांचा पहिला विवाह विनोद रजक यांच्याशी झाला होता. मात्र त्यांच्यात मतभेद झाल्यानंतर त्यांनी विभक्त होत काही महिन्यांपूर्वी राजेंद्र कोठरंगे याच्याशी मंदिरात विवाह केला होता. मात्र, दुसरा पती पैशांच्या कारणावरून मानसिक व शारीरिक छळ करत असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

त्यामुळे त्या गेल्या दीड-दोन महिन्यांपासून गादा येथे दुसऱ्या पतीपासून विभक्त राहत होत्या. अशातच राजेंद्र कोठरंगे हा पुन्हा एकत्र राहण्यासाठी दबाव टाकत होता, असा दावा देखील करण्यात आला आहे.

# अमरावतीचे राजकमल उड्डाणपुल काम पुन्हा संभ्रमात

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



***अमरावती*** - शहराच्या हृदयस्थानी असलेल्या बहुप्रतिष्ठित राजकमल रेल्वे उड्डाणपुलाचे भवितव्य आता पूर्णपणे महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन म्हणजे महारेलच्या निर्णयावर अवलंबून आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे तांत्रिक आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून निविदा काढण्याची तयारी केली असतानाच, शासनाने अचानक ही योजना महारेलकडे सोपविली आहे. यामुळे या कामाबाबत पुन्हा एकदा अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले असून, उड्डाणपुलाची प्रतीक्षा करणाऱ्या नागरिकांच्या पदरी पुन्हा निराशा येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. शहराच्या वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या उड्डाणपुलाचे काम महारेलकडे सोपविल्याने, आता नवीन यंत्रणेला पुन्हा सर्व तांत्रिक आणि प्रशासकीय प्रक्रिया नव्याने कराव्या लागणार आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता प्रकाश राठोड यांनी माहिती दिली की, शासनाचे आदेश प्राप्त होताच आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे आणि प्रक्रिया महारेलला हस्तांतरित करण्यात आली आहे. आता या पुलाच्या बांधकामाची निविदा प्रक्रिया आणि पुढील सर्व निर्णय महारेल स्तरावरूनच घेतले जाणार आहेत. दरम्यान, या महत्त्वाच्या प्रकल्पाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फतच करून घ्यावे, जेणेकरून तांत्रिक मान्यता आणि प्रक्रियेत होणारा अनावश्यक विलंब टाळता येईल, अशी मागणी आ. संजय खोडके यांनी विधिमंडळात केली होती.

दररोज हजारो वाहने या मार्गावरून ये-जा करत असल्यामुळे या पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण होणे गरजेचे आहे, परंतु प्रशासकीय बदलांच्या खेळात हा प्रकल्प पुन्हा एकदा लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# पावसाळा कालावधीतील जलजन्य आजारांच्या अनुषंगाने आवश्यक उपाययोजना करा

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**मुंबई** - संपूर्ण पावसाळ्याच्या कालावधीत मुंबईकरांना सुदृढ आणि निरोगी आरोग्य सेवा देण्यासाठी महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य यंत्रणेने सज्ज रहावे. तसेच पावसाळा कालावधीतील जलजन्य आजारांच्या अनुषंगाने आवश्यक उपाययोजना कराव्यात. तसेच आरोग्य यंत्रणेअंतर्गत पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य समितीचे अध्यक्ष हरीश भांदिर्गे यांनी दिले. पावसाळी आजार प्रतिबंध आणि नियंत्रण आढावा बैठकीच्या निमित्ताने त्यांनी सार्वजनिक आरोग्य यंत्रणेला आगामी पावसाळा कालावधीसाठी पूरक तयारी करण्याचे निर्देश दिले.


## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४५४/२०२६** **ने.ता.२०/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती शिला रघुनाथ खुजे, वय अं.७० वर्ष, धंदा-गृहिणी, २) भारत रघुनाथ खुजे, वय अं.५० वर्ष, धंदा-शेती, ३) दत्तात्रय रघुनाथ खुजे, वय अं.४२ वर्ष, धंदा- शेती, क्र.१ ते ३ रा.लोणी, ता.वरुड, ४) सौ.निता श्याम चरोडे, वय अं.५२ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.हुडकेश्वर, नागपूर, ता.जि.नागपूर, ५) सौ.दिपाली अभय निकम, वय अं.४५ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.अरिहंत कॉलनी, ता.जि.गोंदिया

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रघुनाथ अभिमान खुजे, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०२/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**


# कॉंक्रीट, जलवाहिनीने घेतला झाडाचा जीव

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** - रस्ता कॉंक्रीटीकरणाच्या कामादरम्यान पर्जन्य जलवाहिनी वळवण्यात आल्याचे प्रथमदर्शनी समोर आले आहे.

ज्यामुळे झाडाची मुळे मृत झाली आणि झाडाचा खड्डा व पाया आतून पोकळ झाला. झाडाच्या बुंध्याभोवती मोकळी जागा शिल्लक राहिली नव्हती, अशी माहिती पाहणीदरम्यान उपस्थित असलेल्या मुंबई मनपाच्या अधिकाऱ्याने दिली. मुंबई मनपाच्या तपास पथकाने गुरुवारी घटनास्थळाची पाहणी केली. 'पर्जन्य जलवाहिनी वळवली आणि झाडाच्या बुंध्याभोवती कॉंक्रीटीकरण केले.

ज्यामुळे झाडाचे आरोग्य राखण्यासाठी आजूबाजूला मोकळी जागा उरली नाही. त्यामुळे झाडाची उघडपणे मृत किंवा खराब झालेली दिसत आहेत, ज्यामुळे हे महाकाय झाड आतून कमकुवत झाले होते.

# अमरनाथ यात्रेनिमित्त पंतप्रधानांचे भाविकांना पत्र

**सुरक्षित यात्रेसह 'पाच संकल्प' करण्याचे आवाहन**

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



***नवी दिल्ली*** - पवित्र अमरनाथ यात्रेला प्रारंभ झाल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील भाविकांना उद्देशून विशेष पत्र लिहित शुभेच्छा दिल्या आहेत.

बाबा बर्फानींचे दर्शन हे प्रत्येक शिवभक्तासाठी परमभाग्याचे असून अमरनाथ यात्रा ही केवळ धार्मिक श्रद्धेचे नव्हे, तर भारताच्या सांस्कृतिक ऐक्याचेही प्रतीक असल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे. पंतप्रधानांनी भाविकांना सुरक्षित यात्रा करण्याचे, पर्यावरणाचे संरक्षण करण्याचे आणि स्थानिक नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. तसेच श्रद्धा, सेवा आणि राष्ट्रनिर्मितीचा संदेश अधिक प्रभावी करण्यासाठी पाच महत्त्वाचे संकल्प करण्याचेही त्यांनी सुचविले. पत्रात त्यांनी नमूद केले की, ज्येष्ठ पौर्णिमेच्या प्रथम पूजेनंतर सुरू होणाऱ्या या यात्रेसाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक सहभागी होतात. अमरनाथ धामाची यात्रा आध्यात्मिक ऊर्जा प्रदान करण्याबरोबरच विविध राज्ये, भाषा आणि संस्कृतींना एका श्रद्धेच्या धाग्यात बांधणारी असल्याचे त्यांनी म्हटले.यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी अमरनाथजी श्राइन बोर्ड, जम्मू-काश्मीर प्रशासन, भारतीय सेना, केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ), जम्मू-काश्मीर पोलीस, भारत-तिबेट सीमा पोलीस दल (आयटीबीपी), सीमा सुरक्षा दल (बीएसएफ), राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी आणि स्वयंसेवक यांच्या योगदानाचेही पंतप्रधानांनी कौतुक केले.




# ठराविक दुकानातून पुस्तक खरेदीला चाप : शाळांवर कठोर कारवाईचा इशारा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – विद्यार्थ्यांना विशिष्ट दुकानांतूनच पुस्तके, गणवेश आणि शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या राज्यातील काही खासगी तसेच सीबीएसई, आयसीएसई बोर्डाशी संलग्न शाळांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी विधान परिषदेत सांगितले.

राज्यातील शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य विशिष्ट दुकानातून खरेदी करण्याची सक्ती केली जात असल्याबाबत विधान परिषद सदस्य सुधाकर अडबाले यांनी प्रश्न उपस्थित केला. या चर्चेत सदस्य भाई जगताप, चित्रा वाघ, प्रवीण दरेकर, बच्चू कडू यांनी सहभाग घेतला. या प्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी स्पष्ट केले की, अशा प्रकारच्या सक्तीला शासनाचा ठाम विरोध असून यापूर्वीही काही शाळांवर कारवाई करण्यात आली आहे.

# लंडनमध्ये होणार 'वैश्विक मराठी भाषा केंद्र'

## मुंबईतील मराठी भाषा भवन २०२७ पर्यंत, उदय सामंत यांची माहिती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मराठीचा झेंडा आता इंग्लंडमध्येही फडकणार असून लंडनमध्ये 'वैश्विक मराठी भाषा केंद्र' उभारण्यात येणार आहे. उद्योग तथा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी ही माहिती दिली.

मुंबईतील मराठी भाषा भवनाचे काम वेगाने सुरू असून, डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच, ऐरोली येथे ३४ कोटी रुपये खर्चून भाषा भवनाचे उपकेंद्र उभारण्यात येणार आहे, असेही सामंत यांनी नमूद केले. विधान परिषदेत नियम ९२ अन्वये झालेल्या अर्ध्या तासाच्या चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. मराठीचा डंका जागतिक स्तरावर गाजवण्यासाठी लंडन येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने आंतरराष्ट्रीय वैश्विक मराठी भाषा केंद्र स्थापन करण्यात येत आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाने ५ कोटी रुपये खर्चून 'महाराष्ट्र मंडळाची' ऐतिहासिक इमारत खरेदी केली असून, पुढील दोन महिन्यांत हे केंद्र पूर्णपणे कार्यान्वित होईल, असे मंत्री सामंत यांनी दिली. याशिवाय, जागतिक स्तरावर मराठीचा प्रसार करण्यासाठी ७५ आंतरराष्ट्रीय मराठी मंच उभारण्यात येणार असून, त्यापैकी ३९ मंच आधीच कार्यरत झाले आहेत, असे ते म्हणाले.

या चर्चेत सदस्य उमा खापरे, जगन्नाथ अभ्यंकर, अमित गोरखे आणि मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला होता. केंद्राच्या निधीची वाट न पाहता राज्यात विश्व मराठी संमेलनासह वारकरी, बाल, युवा, महिला आणि कामगार साहित्य संमेलनांना प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामीण भागातील साहित्यिकांचे साहित्य इतर भाषांमध्ये पोहोचवण्यासाठी 'स्वर्गीय यशवंतराव चव्हाण अनुवाद समिती' पुन्हा सुरू करण्यात येत आहे, असे सांगून ते म्हणाले की, प्रत्येक जिल्ह्यात 'जिल्हा भाषा अधिकारी' हे स्वतंत्र पद निर्माण केले जाईल. पुढील एका महिन्याच्या आत ही नियुक्ती केली जाईल.

**ठाकरे जन्मशताब्दीनिमित्त 'मराठी भाषा विकास केंद्र'**

हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यातील महत्त्वाच्या शहरांमध्ये मोठी पावले उचलली जात आहेत. नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, पुणे, कोल्हापूर आणि रत्नागिरी येथे 'मराठी भाषा विकास केंद्र' सुरू करण्यात येणार आहेत. तसेच, भाषाविषयक कामांना गती देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र 'जिल्हा भाषा अधिकारी' नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्याची अंमलबजावणी आगामी एका महिन्यात केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

# शेतकरी महिला विधेयक मंजूर

**राज्याबाहेरील शेतमजूर महिलांना शेतकरी दर्जा नाही, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची माहिती**



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – शेती आणि संलग्न कार्यात सहभागी असलेल्या महिलांना महिला शेतकरी म्हणून मान्यता देणारे 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक' गुरुवारी विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले.

शेतीच नव्हे तर पशुपालन, मत्स्यपालन, कुकुटपालन तसेच इतर शेती संलग्न व्यवसायात असलेल्या महिलांना या विधेयकामुळे शेतकरी दर्जा मिळणार आहे. महिलेच्या नावावर सातबारा नसला तरी त्यांना शेतकरी प्रमाणपत्र दिले जाणार असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी यावेळी स्पष्ट केले. भरणे यांनी बुधवारीच बहुचर्चित 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक' विधानसभेत मंजुरीसाठी सादर केले होते. गुरुवारी त्यांनी या विधेयकाचा हेतू आणि उद्देश स्पष्ट केला. शेतजमीन महिलांच्या नावावर करणे हा विधेयकाचा उद्देश नाही. तर कृषिक्षेत्र अथवा शेतीशी संबंधित क्षेत्रात ज्या महिला काम करतात, त्यांना स्वत:ची शेतकरी म्हणून ओळख मिळावी हा उद्देश असल्याचे भरणे यांनी सांगितले.

हे केवळ शेतकरी प्रमाणपत्र नसेल तर महिला शेतकऱ्यांची स्वतंत्र ओळख निर्माण करून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याचा उद्देश या विधेयकाचा आहे. १५ ते २० टक्क्यांपेक्षा कमी महिलांची नावे सातबारावर आहेत, असेही भरणे यांनी सांगितले. ५० टक्के जमीन महिलांच्या नावे करा : जयंत पाटील या विधेयकावरील चर्चेत सहभागी होताना राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या जयंत पाटील यांनी शेतकरी पतीच्या नावावरील ५० टक्के शेतजमीन महिलांच्या नावे करण्याची मागणी केली.

